**स्पे.मु.नं.१६१/१९९५**

श्रीमती सिताबाई नारायण देशमुख .....वादी

वि.

श्री.जयवंत बाळकृष्ण देशमुख, वगैरे ....प्रतिवादी.

## :: संयुक्त आदेश निशाणी १७९, १८१ व १८३ वर ::

प्रस्तुत अर्ज मयत प्रतिवादी क्र.८ अलका विलास चौधरी हिचे विरुध्द प्रस्तुत दावा क्षमापित करण्यात आलेला आदेश रद्द होऊन मिळण्याकरीता, तिचे वारस अभिलेखावर घेण्याकरीता व त्याकरीता झालेला विलंब माफ होऊन मिळण्याकरीता दाखल केलेले आहेत.

२. अर्जात असे नमूद करण्यात आले की, प्रतिवादी क्र.८ अलका विलास चौधरी ही दि. २९/१२/२०१६ रोजी मौजे-चोण, ता.अंबरनाथ, जि.ठाणे येथे मयत झाली आहे. श्री.विलास यशवंत देशमुख, श्री.राहुल विलास देशमुख, श्री.राकेश विलास देशमुख व संध्या विलास देशमुख हे तिचे वारस आहेत. प्रस्तुत प्रकरण पुढे चालविण्याकरीता वारस अभिलेखावर घेणे आवश्यक आहे. सदर वारस अभिलेखावर घेण्याकरीता एकूण ४ महिने २० दिवसांचा विलंब झालेला आहे असे नमूद केलेले आहे. सदर विलंब माफ न केल्यास अर्जदारांचे अपरीमित नुकसान होईल. म्हणून वारस अभिलेखावर घेण्याकरीता झालेला विलंब माफ होऊन मिळण्याकरीता, तिचे वारस अभिलेखावर घेण्याकरीता व मयत प्रतिवादी क्र.८ अलका विलास चौधरी हिचे विरुध्द प्रस्तुत दावा क्षमापित करण्यात आलेला आदेश रद्द होण्याकरीता विनंती केलेली आहे.

३. प्रस्तुत अर्जास प्रतिपक्षाच्या बाजूने निशाणी १९० वर संयुक्त लेखी म्हणणे दाखल करण्यात आले. त्यात त्यांनी असे नमूद केले की, सदर तथ्य कथने चूकीची ओत. विलंबाचे संयुक्तीक कारण दिलेले नाही. सबब, सदर अर्ज खर्चासह रद्द करण्याची विनंती त्यांनी केली.

४.  अर्जातील तथ्य कथन तसेच प्रतिकथनाचे अवलोकन केले. वादीच्या बाजूने वकील श्री.स्वप्नेश घरत यांचा युक्तीवाद ऐकला. प्रस्तुत अर्ज हे दि. १८/०८/२०१७ रोजी दाखल केले आहेत. प्रस्तुत अर्जात विलंबाकरीता नमूद करण्यात आलेले कारण असे की, प्रतिवादींतर्फे वकिलांकडून प्रतिवादी क्र.८ चे मृत्यूबद्दल माहिती तात्काळ देण्यात आली नव्हती. म्हणून प्रस्तुत अर्ज दाखल करण्यास विलंब झाला. सदर कारण विचारात घेता झालेला विलंब माफ होऊन मिळण्यास वादी हक्कदार आहे. तसेच प्रतिपक्षाने युक्तीवादा दरम्यान सदर अर्जास खर्च लादण्याच्या अटीवर हरकत नसल्याचे सांगितले. तसेच दावा पुढे चालविण्याकरीता व न्यायहिताकरीता अर्जदारावर खर्च बसवून विलंब माफ करण्यास काहीही हरकत नाही. प्रस्तुत दावा हा करारपुर्ततेकरीता दाखल केला आहे. सबब, सदर दाव्याचा वाद विषय विचारात घेता प्रस्तुत अर्ज मंजूर होण्यास पात्र आहे. म्हणून, मी खालीलप्रमाणे आदेश पारीत करीत आहे.

## :: आ दे श ::

१. प्रस्तुत अर्ज मंजूर करण्यात येत आहे.

२. मयत प्रतिवादी क्र.८ अलका विलास चौधरी हिचे विरुध्द प्रस्तुत दावा क्षमापित करण्यात आलेला आदेश रद्द करण्यात येतो.

३. मयत प्रतिवादी क्र.८ अलका विलास चौधरी हिचे वारस अभिलेखावर घेण्याकरीता झालेला विलंब माफ करण्यात येतो व तिचे वारस श्री.विलास यशवंत देशमुख, श्री.राहुल विलास देशमुख, श्री.राकेश विलास देशमुख व संध्या विलास देशमुख यांना अभिलेखावर घेण्यास परवानगी देण्यात येते.

४. सदर अर्जाचा खर्च रक्कम रु.२०००/- वादीने सोसावा.

सही/-<br>(राजेश क. खोमणे)<br>सह दिवाणी न्यायाधीश, व.स्तर, पनवेल

पनवेल.<br>दिनांक २७/१०/२०१७.